## फास्ट न्यूज



### एका दगडात दोन पक्षी

**कोलकाता :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीने गुरुवारी एका दगडात दोन पक्षी मारले. तो कोलकात्यातील इडन गार्डनवर माजी कर्णधार कपिल देव यांच्यासह एका जाहिरातीच्या चित्रकरणात सहभागी झाला होता. यावेळी त्याने मध्येच वेळ काढत स्टेडियमच्या खेळपट्टीची पाहणी केली. येथेच रंगणाऱ्या पहिल्या कसोटीत भारत श्रीलंकेचा सामना करणार आहे. धोनी कसोटीतून निवृत्त झाला असला, तरी कसोटी संघातील आपल्या सहकाऱ्यांसाठी खेळपट्टीचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला. त्याने खेळपट्टी बघून क्युरेटरचे कौतुकही केले.

### कोहलीचा सल्ला

**नवी दिल्ली :** सोशल मीडियावर तासनतास घालविण्यापेक्षा मैदानावर जाऊन खेळ खेळावे, असा सल्ला भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार विराट कोहलीने मुलांना दिला. एका कार्यक्रमात तो म्हणाला, 'सध्या मुले व्हिडिओ गेममध्येच अधिक रमतात. पण या वयात शारीरिक तंदुरुस्ती फार महत्त्वाची असते. त्यामुळे प्रत्येकाने मैदानात येऊन एकतरी खेळ खेळावा. आणि हा माझा सल्ला केवळ मुलांनाच नाही, तर सर्वांसाठी आहे.'

### जयरामची माघार

**नवी दिल्ली :** दुखापतीमुळे भारताचा बॅडमिंटनपटू अजय जयरामने आगामी चीन आणि हाँगकाँग ओपन सुपर सीरिज स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. गुडघ्याच्या दुखापतीमुळे मी जागतिक स्पर्धेपासून मी खेळू शकलेलो नाही. अद्यापही मी दुखापतीतून सावरलेलो नाही, असे अजय जयराम म्हणाला.

### 'दुहेरीला वेळ द्या'

**नवी दिल्ली :** एकेरीत भारतीय खेळाडू जगातील अव्वल खेळाडूंना आव्हान देत असताना दुहेरीत मात्र भारतीय बॅडमिंटनपटूंना हवी तशी प्रगती करता येत नाही. मात्र, ही परिस्थिती बदलायला थोडा वेळ लागेल, असे मत भारताच्या अश्विनी पोनप्पाने व्यक्त केले. तिने नुकताच राष्ट्रीय स्पर्धेत दुहेरी मुकुट मिळवला. लवकरच जागतिक स्तरावर आपले दुहेरीतील खेळाडू आव्हान निर्माण करतील, असा विश्वास तिने व्यक्त केला.

### पेस-राजाची आगेकूच

**नवी दिल्ली :** भारताच्या लिअँडर पेस आणि पूरव राजा यांनी नोक्सव्हिल चॅलेंजर टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. पेस-पूरव जोडीने अमेरिकेच्या केविन किंग-ब्रॅडली लानवर ६-२, ६-४ असा विजय मिळवला. दिवीज शरण-मिखाईल एल्गिन जोडीला मात्र पराभव पत्करावा लागला.

# बडोद्याविरुद्ध मुंबई १७१

## बडोद्याची १ बाद ६३ अशी झुंज

संतोष बने


**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई

बहुतांश नव्या चेहऱ्यांना संधी देणाऱ्या बडोद्याच्या संघाने तशीच नवीकोरी कामगिरी करताना मुंबईला पहिल्या डावात १७१ धावांवर रोखण्यात यश मिळविले. रणजी क्रिकेट इतिहासात ४१ विजेतीपदे जिंकणाऱ्या मुंबईचा हा ५०० वा रणजी सामना आहे. त्यामुळे या सामन्यात मुंबईची कशी कामगिरी होते, याकडे सर्वांचे लक्ष असेल. पहिल्याच दिवशी यजमान मुंबईची अवस्था मात्र बिकट बनली. लुकमान मेरीवाला आणि अतित शेठ या दोघा मध्यमगती गोलंदाजांनी प्रत्येकी पाच बळी मिळवत यजमान मुंबईला घाम फोडला. वानखेडे स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यात एकावेळी मुंबईची स्थिती ७ बाद १२५ अशी असताना मुंबईचा संघ १५० धावांचा पल्ला तरी गाठतो का, अशी शंका वाटत होती. पण विजय गोहील आणि धवल कुलकर्णी यांनी छोटेखानी खेळी करून मुंबईला निदान १७१ धावांपर्यंत मजल मारून दिली. त्यानंतर मुंबईच्या धावसंख्येचा पाठलाग करताना बडोद्याने १ बाद ६३ धावसंख्येपर्यंत मजल मारली असून अद्याप ते १०८ धावांनी पिछाडीवर आहेत.

मुंबईने रणजी स्पर्धेच्या या हंगामात ओदिशाला नमवून विजयी सुरुवात केली आहे पण तामिळनाडू व मध्य प्रदेशविरुद्धचे सामने अनिर्णीत राहिले आहेत. त्यात तामिळनाडूने पहिल्या डावातील आघाडीवर ३ गुण घेतले तर मध्य प्रदेशविरुद्ध मुंबईने ३ गुण मिळविले.

मुंबईकडून ५००व्या रणजी सामन्यात दमदार सुरुवात केली जाईल, अशी अपेक्षा असताना सलामीवीर पृथ्वी शॉ आणि तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला अजिंक्य रहाणे शून्यावर बाद झाले. त्यामुळे मुंबईची स्थिती २ बाद ५ अशी झाली. त्यावेळी २००६च्या रणजी उपांत्य फेरीची आठवण काढली गेली. त्या सामन्यात मुंबईचे पहिले पाच फलंदाज मुंबईचे खातेही उघडलेले नसताना तंबूत परतले होते. पण सलामीवीर आणि कर्णधार आदित्य तरेने जिगरबाज खेळी करत अर्धशतकी खेळी केली आणि मुंबईला सावरले. त्याने एक बाजू लावून धरलेली असताना दुसऱ्या टोकाकडून मात्र त्याला साथ लाभली नाही. सूर्यकुमार यादव (१०), श्रेयस अय्यर (२८) बाद झाले आणि मुंबई ४ बाद ८४ अशा कठीण परिस्थितीत सापडली. त्यानंतर मुंबईने धावांचे शतक पूर्ण केले पण टिकून राहिलेल्या तरेचा अडसर शेठने दूर केला. सिद्धेश लाडने २१ धावांची उपयुक्त खेळी केली खरी पण ती पुरेशी नव्हती. तिकडे अभिषेक नायरही १० धावा काढून बाद झाला आणि मुंबई ६ बाद ११९ अशा कोंडीत सापडली. सिद्धेशही मेरीवालाच्या गोलंदाजीवर झेलचीत झाला. त्यामुळे मुंबईचा संघ १५०चा टप्पा तरी गाठतो की नाही, अशी शंका उपस्थित केली जाऊ लागली. मात्र धवल कुलकर्णी (१७) आणि विजय गोहिल (१६) यांनी ४० धावांची भागीदारी करत मुंबईला १७१ धावसंख्येपर्यंत नेले.

बडोद्याने मुंबईची ही छोटी धावसंख्या असतानाही अतिआत्मविश्वास न दाखवता खेळ केला. पण मुंबईचा डावखुरा वेगवान गोलंदाज रॉयस्टन डायसचे कौतुक करावे लागेल. त्याने शानदार गोलंदाजीचे प्रदर्शन करताना ७ षटकांत केवळ १५ धावा देत बडोद्याचा सलामीवीर अतित पठाणला माघारी धाडले. यष्टिपाठी आदित्य तरेने त्याला झेलचीत केले. दुसऱ्या टोकाकडे अनुभवी आदित्य वाघमोडेने मात्र संयम राखला. ८८ चेंडूंत त्याने १५ धावा केल्या होत्या. नंतर आलेल्या विष्णू सोलंकीने खेळाचा वेग वाढवला. त्याने ४५ चेंडूंत ३२ धावा केल्या.





पृथ्वी शॉ बाद झाला तो क्षण

### अंकित, रोहितने महाराष्ट्राला सावरले

**पुणे:** महाराष्ट्राच्या वाटेला रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील घरच्या मैदानावरील लढतीत पुन्हा एकदा प्रथम फलंदाजी आली. गवत असलेल्या खेळपट्टीवर सुरुवातीला गोलंदाजांना मदत मिळणे अपेक्षित होते. रेल्वेच्या गोलंदाजांनी टप्प्यावर मारा करून महाराष्ट्राच्या आघाडीच्या तीन फलंदाजांना ७१ धावांत माघारी परतवले. यानंतर कर्णधार अंकित बावणेने सुरुवातीला नौशाद शेख आणि नंतर रोहित मोटवाणीच्या साथीने महाराष्ट्राचा डाव सावरला. त्यामुळे महाराष्ट्राने पहिल्या दिवसअखेर रेल्वेविरुद्ध ५ बाद २४९ धावा केल्या. बावणेचे शतक आठ धावांनी हुकले. मोटवाणी ५२ धावांवर खेळत आहे. गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर ही लढत सुरू आहे. **स्कोअरबोर्ड:** महाराष्ट्र ५ बाद २४९ (ऋतुराज गायकवाड २५, राहुल त्रिपाठी २९, अंकित बावणे ९२, नौशाद शेख ३७, रोहित मोटवानी खेळत आहे ५२; अमित मिश्रा २२-६-४८-२, करण ठाकूर २०-४-५२-२ ) वि. रेल्वे.

### स्कोअरबोर्ड

**मुंबई ५६.२ षटकांत १७१**

(आदित्य तरे ५०, श्रेयस अय्यर २८, सिद्धेश लाड २१, धवल कुलकर्णी १७, विजय गोहिल १६, अतित शेठ १९-४-५०-५, लुकमान मेरीवाला १६.२-२-५२-५) वि.

**बडोदा १ बाद ६३**

(आदित्य वाघमोडे खेळत आहे १५, विष्णू सोलंकी खेळत आहे ३२, रॉयस्टन डायस ७-२-१५-१).

# बालमोहनचे विजय

**मुंबई :** बालमोहन विद्यामंदिरच्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या संघांनी गुरुवारी हॅरिस शील्ड क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत विजयाची नोंद केली. बालमोहन इंग्रजी माध्यमने रायन इंटरनॅशनलवर १२१ धावांनी खणखणीत विजय मिळवला. तर मराठी माध्यमाच्या बालमोहन संघाने सीडब्ल्यूसीवर नऊ विकेट्स राखून मात केली.

बालमोहन विद्यामंदीर इंग्रजी माध्यमाने प्रथम फलंदाजी करताना १७५ धावा केल्या. या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या रायनला त्यांनी ५४ धावांत गुंडाळले. अन्वित बोबेने रायनचा निम्मा संघ गारद केला, तर मैत्री गर्देने सात धावांत चार फलंदाज टिपले. बालमोहन मराठी माध्यम शाळेने सीडब्ल्यूसीवर सहज विजय मिळला. अथर्व चव्हाणने सीडब्ल्यूसीचा निम्मा संघ ३५ धावांत गुंडाळला, तर निसर्ग भुवडने १८ धावांत तीन फलंदाजांना बाद केले. ६० धावांचे माफक आव्हान बालमोहनने एका मोहऱ्याच्या मोबदल्यात पार केले.

**सामन्यांचे निकाल:** 'अ' गट- आरएन पोद्दार ४७ (करण बद्र ३/१३) पराभूत वि. अंजुमन ए इस्लाम (उर्दू) ५०/०. व्हीपीएमएस दहिसर १२४ (गणेश भटी ४/४३) पराभूत वि. माटुंगा प्रीमियर हाय स्कूल १२५/७ (शरण बरास्कर ३/२०, शरण शेट्टी ३/१५). 'ब'- सीडब्ल्यूसी ५९ (अथर्व चव्हाण ५/३५, निसर्ग भुवड ३/१८) पराभूत वि. बालमोहन विद्यामंदीर (मराठी) ६०/१. बालमोहन विद्यामंदीर (इंग्लिश) १७५ (आयुष मिश्र ६/६२) विजयी वि. रायन ५४ (अन्वित बोब ५/१८, मैत्री गद्रे ४/७). व्हीएन सुळे गुरुजी ५/३७१ (वेदप्रकाश जैस्वाल ९६, शुभम गिरकर ९०, आयुष झिमरे ७७) विजयी वि. गोपी बिर्ला ७८ (आयुष झिमरे ४/७).

# लंकेविरुद्धची मालिका पूर्वतयारीसाठी

### कसोटीतज्ज्ञ चेतेश्वर पुजाराचे मत

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचे पुढील मिशन भले श्रीलंकेविरुद्धची मालिका असेल; पण कोहली आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मोठे आव्हान असणार आहे आहे ते पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणाऱ्या दक्षिण आफ्रिका दौऱ्याचे. भारतीय कसोटी संघाचा तज्ज्ञ चेतेश्वर पुजारादेखील याला अपवाद नाही. त्यामुळेच श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेबाबत बोलताना त्याने सर्वप्रथम उल्लेख केला तो दक्षिण आफ्रिका दौऱ्याचा. अर्थात त्याला श्रीलंकेच्या मालिकेचा संदर्भ होताच.

'अर्थातच दक्षिण आफ्रिका दौऱ्याचा विचार डोक्यात सुरूच आहे. त्यासाठी श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेचा पूर्वतयारी म्हणून पुरेपूर उपयोग करून घेता येईल. मला आत्मविश्वास आहे की आम्ही लंकेविरुद्ध सरस कामगिरी करत दक्षिण आफ्रिकेला रवाना होऊ', असे पुजाराने वृत्तसंस्थेशी संवाद साधताना सांगितले. ६ जानेवारीपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या केपटाऊन कसोटीला सुरुवात होते आहे. त्याच पार्श्वभूमीवर पुजाराला त्याच्या तयारीविषयी पुन्हा प्रश्न केला असता तो म्हणाला, 'मुख्य तयारीला दौरा जवळ आला की सुरुवात होईलच; पण मला असे वाटते की श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीसाठी आम्ही एकत्र जमू तेव्हा दक्षिण आफ्रिका दौऱ्याबाबत गांभीर्याने विचार करू. त्यासाठी योजना नक्कीच असतील'. यानंतर प्रश्न येतो तो श्रीलंकासंघाबाबत. कारण पुढच्याच आठवड्यात भारत त्यांच्याविरुद्ध दोन हात करणार आहे. 'आपल्यासह प्रतिस्पर्धीदेखील नव्या जोमाने व उमेदिने तयार होतो. श्रीलंका संघ हा आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणारा संघ आहे त्यांचा आदर करायलाच हवा', असे पुजाराने सांगितले.

### दृष्टिक्षेप

- काही महिन्यांपूर्वीच पार पडलेल्या श्रीलंका दौऱ्यावर पुजाराने दोन कसोटींमध्ये अनुक्रमे १५३ आणि १३३ धावा केल्या आहेत.
- अलीकडेच झारखंडविरुद्धच्या रणजी झुंजीत सौराष्ट्रचे प्रतिनिधित्व करताना पुजाराने २०४ धावांची खेळी केली. यासह त्याच्या प्रथम श्रेणीतील द्विशतकांची संख्या १२ झाली असून अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे.

# भारताविरुद्ध अष्टपैलूचा समावेश?

**वृत्तसंस्था,** कोलकाता

जे डावपेच पाकिस्तानविरुद्ध फळले ते भारताविरुद्ध यशस्वी ठरतीलच असे नाही. तेव्हा कोहली आणि कंपनीचा मुकाबला करताना नव्या डावपेचांनिशी सज्ज व्हावे लागेल, याचे भान सहाजिकच श्रीलंकेचा कर्णधार दिनेश चंडिमलला आहे. तेव्हा पाकिस्तानविरुद्ध खेळवले तसे पाच तज्ज्ञ गोलंदाज भारताविरुद्ध दिसणार नाहीत, असे चंडिमलने स्पष्ट केले. भारतात आगमन झाल्यानंतर त्याने गुरुवारी मीडियाशी संवाद साधला.

'पाकिस्तानविरुद्ध यूएईमध्ये खेळताना वातावरण, खेळपट्ट्या वेगळ्या होत्या. तिथल्या उष्ण वातावरणात पाच गोलंदाज खेळवणे फायदेशीर ठरले. भारतात तसे करून चालणार नाही. भारताकडे खूप चांगले गोलंदाज आहेत, तेव्हा आम्हाला पाचऐवजी चार गोलंदाज खेळवून एका अष्टपैलूचा समावेश करावा लागेल. तसेही खेळपट्टी बघूनच अंतिम संघ निवडणार', चंडिमल ओघात खूप काही सांगतो खरा; पण आपण सर्वच पत्ते उघड करत असल्याचे जाणवल्यावर तो खेळपट्टीची सबब पुढे करत वेळ मारून नेतो. भारताने आपल्या गेल्या दोन्ही श्रीलंका दौऱ्यांमध्ये दणदणीत यश मिळवले आहे; पण त्यानंतर श्रीलंकेनेही पाकिस्तानला त्यांच्या 'घरच्या' (यूएई) मैदानावर कसोटीत २-० असे हरवले. अर्थात हा सूर वनडेत राखण्यात अपयश आल्याने पाकिस्तानने श्रीलंकेला ५-० असे अक्षरशः धुतले.



दिनेश चंडिमल

### दृष्टिक्षेप

- १९८२पासून श्रीलंकन संघ अधिकृत कसोटी खेळण्यासाठी भारत दौऱ्यावर येतो आहे; पण अद्याप त्यांना भारतात भारताविरुद्ध एकही कसोटी जिंकता आलेली नाही.
- पाकिस्तानविरुद्ध श्रीलंकन संघ पाच गोलंदाज घेऊन खेळले होते; पण भारताविरुद्ध चार तज्ज्ञ गोलंदाज घेऊन खेळवण्याचे संकेत श्रीलंकेच्या संघव्यवस्थापनाकडून देण्यात येत आहेत.
- श्रीलंकेचा कर्णधार दिनेश चंडिमलने सांगितले की, अश्विन व जाडेजा यांच्याशी दोन हात करण्यासाठी डावपेच तयार आहेत; पण त्या चाली उघड करण्यास त्याने सहाजिकच नकार दिला.
- गेल्या काही वर्षांत भारताने श्रीलंकेपुढे कडवे आव्हान उभे करताना सरस कामगिरी केली आहे; पण त्याचे चंडिमलवर दडपण नाही.

### समीकरण बदलणार!

'हो मान्य की आम्ही १९८२पासून भारताचे अधिकृत दौरे करत आहोत; पण इथे किमान एक कसोटी जिंकणेही आम्हाला जमलेले नाही. मात्र हे समीकरण आम्ही बदलू. अर्थात एक गोष्ट मात्र खरी की त्यासाठी आम्हाला आव्हानाचा खूप मोठा 'डोंगर' पार करायचा आहे. आमचा पहिला सामना कोलकात्यात होतो आहे. इथल्या प्रेक्षकांसमोर खेळणे म्हणजे अल्हाददायक असते. सुरुवात चांगली झाली, तर पुढील कामे सोपे होतील', इडन गार्डन्सवरील आपला पहिला नेट सराव पार पडल्यानंतर चंडिमलने हा संवाद साधला.

# 'ऑलिम्पिक प्रवेश मिळवणे सर्वांत कठीण'

**वृत्तसंस्था,** नवी दिल्ली



'ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवणे सोपे आहे; पण या स्पर्धेत प्रवेश मिळवण्यासाठी पार करावे लागणारे अडथळे खूप कठीण वाटतात', अशा शब्दात प्रतिक्रिया व्यक्त केली आहे ती पाचवेळा जगज्जेती ठरलेल्या मेरीकोमने. दोन दिवसांपूर्वीच तिने आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. या पदकासह ती गुरुवारी मायदेशात परतली अन् तिने मीडियाशी संवाद साधला.

आता तिचे मुख्य ध्येय आहे ते २०१८च्या राष्ट्रकुलमध्ये सुवर्णपदक पटकावणे. मात्र २०२०च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये खेळण्याबाबत तिने विचार केलेला नाही.

एवढी वर्षे आंतरराष्ट्रीय बॉक्सिंगमध्ये आपला दबदबा निर्माण केलेली मेरी कोम फिटनेसबाबत सजग आहे. बॉक्सिंग हा 'बॉडी कॉन्टॅक्ट' खेळ आहे; पण चोख फिटनेस राखत ती तरुण बॉक्सर्सनाही आव्हान देते. 'होय आमच्या खेळात जोखीम ही आलीच. मात्र फिटनेस असल्याने मी अदृष्य आहे की काय, असे वाटते. अशा फिटनेसच्या बळावर मी कुणालाही हरवू शकते. मग तुम्ही कुणालाही माझ्यासमोर आणा, त्याला चीतपट करेनच. माझा ४८ किलो हा वजनी गट ऑलिम्पिकमध्ये कायम राहिला तर बरे होईल; कारण हा गट मला भावतो', असेही मेरी म्हणाली.

हवाई अधिभार : गोवा मार्गे १ रुपया, इंदूर, चेन्नई मार्गे ३ रुपये, अहमदाबाद, बंगलोर, कोची, कोइम्बतूर, एर्नाकूलम, हैदराबाद, कोझिकोड, मंगळूर, त्रिवेंद्रम, उदयपूर, विझागमार्गे ४ रुपये, दिल्ली, कोलकाता मार्गे ५ रुपये.
रस्ते अधिभार : रु. २.०० (बलसाड जिल्हा, सिल्वासा, दमण, इंदौर ही शहरे वगळून.)
वर्ष : ५६ अंक : १२२
बेनेट, कोलमन अँड कंपनी लि.च्या वतीने आर. कृष्णमूर्ती, यांनी टाइम्स ऑफ इंडिया इमारत, डॉ. डी. एन. रोड, मुंबई - ४०० ००१ येथे प्रकाशित केले व १) द टाइम्स ऑफ इंडिया सबर्बन प्रेस, आकुर्ली रोड, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, कांदिवली (पू), मुंबई - ४०० १०१, फोन (०२२) २८८७२३२४, २८८७२९३०, फॅक्स - (०२२) २८८७४२३०. २) द टाइम्स ऑफ इंडिया प्रिंट सिटी, प्लॉट नं. ४, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, ठाणे-बेलापूर रोड, ऐरोली, नवी मुंबई-४००७०८. फोन (०२२) २७६०९९९९, फॅक्स - (०२२) २७६०५२७५ येथे मुद्रित केले. © सर्वाधिकार सुरक्षित, प्रकाशकांच्या लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: पुनर्प्रकाशनास बंदी. कार्यकारी संपादक : अशोक पानवलकर, संपादक : श्रीकांत बोजेवार* (मुंबई आवृत्ती) (*पीआरबी कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीसाठी जबाबदार)
नोंदणी क्र. एमसीएस/०६३/२०१५-१७. आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ९२४९/६२.

Pidilite

## PIDILITE INDUSTRIES LIMITED

FEVICOL | DR. FIXIT WATERPROOFING EXPERT | ONE DROP INSTANT ADHESIVE Fevikwik | M-seal | fevi stik super

### EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND SIX MONTHS ENDED 30.09.2017

(₹ In crores)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | | Consolidated | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended | Quarter ended | Six months ended | Six months ended | Year ended | Quarter ended | Quarter ended | Six months ended | Six months ended | Year ended |
| | | 30.09.2017 | 30.09.2016 | 30.09.2017 | 30.09.2016 | 31.03.2017 | 30.09.2017 | 30.09.2016 | 30.09.2017 | 30.09.2016 | 31.03.2017 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Audited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Audited) |
| 1 | Total income from operations | 1398.75 | 1360.78 | 2911.92 | 2873.50 | 5408.75 | 1563.54 | 1561.90 | 3267.44 | 3277.28 | 6174.56 |
| 2 | Net Profit for the period (before tax and Exceptional items) | 383.24 | 314.72 | 700.61 | 700.68 | 1239.06 | 377.37 | 322.40 | 707.13 | 711.98 | 1248.27 |
| 3 | Net Profit for the period before tax (after Exceptional items) | 383.24 | 314.72 | 700.61 | 700.68 | 1144.72 | 377.37 | 322.40 | 707.13 | 711.98 | 1248.27 |
| 4 | Net Profit for the period after tax (after Exceptional items) | 260.95 | 226.16 | 478.03 | 498.54 | 773.79 | 252.92 | 231.23 | 479.43 | 503.38 | 863.22 |
| 5 | Total Comprehensive Income for the period (Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax) | 260.45 | 226.05 | 477.03 | 498.35 | 771.81 | 257.20 | 231.12 | 478.71 | 503.19 | 861.05 |
| 6 | Equity Share Capital | 51.28 | 51.27 | 51.28 | 51.27 | 51.27 | 51.28 | 51.27 | 51.28 | 51.27 | 51.27 |
| 7 | Reserves excluding Revaluation Reserve | - | - | - | - | 3348.08 | - | - | - | - | 3419.64 |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 1/- each) | | | | | | | | | | |
| | 1. Basic: | @5.09 | @4.41 | @9.32 | @9.72 | 15.09 | @ 4.91 | @ 4.50 | @ 9.33 | @9.77 | 16.77 |
| | 2. Diluted: | @ 5.09 | @ 4.41 | @ 9.32 | @ 9.72 | 15.09 | @ 4.91 | @ 4.50 | @ 9.33 | @ 9.76 | 16.77 |

@ For the period only and not annualised.

**Note:**

The above is an extract of the detailed format of unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Unaudited Financial Results are available on the Stock Exchange websites (www.nseindia.com and www.bseindia.com) and on Company's website www.pidilite.com

Place : Mumbai
Date : 8th November, 2017

**Bharat Puri**
**Managing Director**

**Regd. Office:** 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
**Tel No.:** 91 22 2835 7000 | **Fax:** 91 22 2835 6007 | **Email address:** investor.relations@pidilite.co.in | **Website:** www.pidilite.com | **CIN:** L24100MH1969PLC014336